# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

**४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.**

☎ २५६५६२३४ **Email:ropune@dtemaharashtra.gov.in** Web Site :- **www.ropune.org.in**

जा.क्र.तंशिविकापु/विवि/डि.बी.टी.पोर्टल/ २०१९/ 4418 दिनांक :- 24 OCT 2019

प्रति,
प्राचार्य/संचालक
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व तंत्रशिक्षण संस्था,

विषय :- विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचा लाभ मिळण्यासाठी डी.बी.टी . पोर्टलवर विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जावरील प्रलंबित कार्यवाही त्वरीत पूर्ण करण्याबाबत..

संदर्भ :- संचालनालयाचे पत्र क्र 18/तशिस/डीबीटी/2019/460 दिनांक 15/10/2019

शैक्षणिक वर्ष २०१९-२० आपले सरकार डी.बी.टी पोर्टल (संकेतस्थळ https://mahadbtmahait.govt.in) वर महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यापैकी खालील योजना तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येतात.

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२. डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना
३. राज्य शासनाची अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती योजना (भाग -१ वैद्यकीय अभ्यासक्रम वगळून)

**उपरोक्त संदर्भिय पत्राद्वारे प्राप्त निर्देशानूसार सर्व संस्थाना सुचित करण्यात येते की, संस्थेमध्ये शिकणा-या सर्व पात्र विद्यार्थ्यांकडून उपरोक्त तीन्ही योजनांसाठीचे नवीन व नुतनीकरणाचे अर्ज <u>दिनांक ३१/१०/२०१९</u> या मुदतवाढी नंतरच्या अंतिम दिनांक पूर्वी भरुन घ्यावेत तसेच संस्थांनी आपल्या लॉगीनमध्ये प्राप्त अर्जाची छाननी प्रलंबित न ठेवता अर्ज निकाली काढावेत.**

**या बाबत असेही सुचित करण्यात येते की, कोणताही पात्र विद्यार्थी उपरोक्त याजनेसाठी अर्ज भरण्यापासून वंचित राहणार नाही याची दक्षता स्वतः संस्थेच्या प्राचार्यांनी घ्यावी. तसेच अर्ज न भरु शकल्यामूळे किंवा संस्थांनी प्राप्त अर्ज निकाली न काढल्यामूळे पात्र विद्यार्थी शिष्यवृत्ती योजनांच्या लाभापासून वंचित राहिल्यास त्याची सर्वसवी जबाबदारी संस्थेच्या प्राचार्यांची राहील, याची सर्व संस्थांच्या प्राचार्यांनी नोंद घ्यावी.**

(डॉ. दि.रा.नंदनवार)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

F/(


# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३ , महापालिका मार्ग पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६१७९६९ , फॅक्स § २२६९०००७

E-mail : desk18@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in


**ईमेल / स्पीड पोस्टद्वारे**

क्रमांक : १८/तशिसं/डीबीटी/२०१९/४६७

दिनांक : १५/ १० /२०१९

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

विषय : **विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचा लाभ मिळण्यासाठी डी.बी.टी. पोर्टलवर विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जावरील प्रलंबित कार्यवाही त्वरित पूर्ण करण्याबाबत ......**

संदर्भ : १. या संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०१९/३७१ दि.०५/०८/२०१९

२. या संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०१९/४१५ दि.१९/०९/२०१९

**आपले सरकार डी.बी.टी पोर्टल** ( संकेतस्थळ : **https://mahadbtmahait.gov.in** ) वर महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यापैकी खालील योजना तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येतात.

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना

२) डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना

३) उच्च व्यावसायिक व इयत्ता १२ वी नंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना ( भाग-१ वैद्यकीय अभ्यासक्रम वगळून )

उपरोक्त संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये सन २०१९-२० च्या **महाडीबीटी पोर्टल** वरील उपरोक्त योजनांच्या अंमलबजावणीसाठी पोर्टलवर जाहिर केलेल्या वेळापत्रकानुसार सर्व विभागीय कार्यालयांना व त्यांच्या विभागांतर्गत येणाऱ्या सर्व संस्थांना कळवून आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत या संचालनालयाने सूचित केलेले आहे.

तसेच संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये सदर कार्यवाही अतिशय मंदगतीने सुरु असून त्यामध्ये वेगाने कार्यवाही करण्याबाबत व कोणताही पात्र विद्यार्थी योजनांच्या लाभापासून वंचित राहू नये यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या.

सदर कामकाज मंदगतीने सुरु असल्याने **महाडीबीटी पोर्टल** वर जाहिर केलेल्या वेळापत्रकामध्ये, कोणताही पात्र विद्यार्थी योजनांच्या लाभापासून वंचित राहू नये यासाठी शासनाने **विद्यार्थ्यांकडून अर्ज स्विकारण्यासाठी दि.३१/१०/२०१९ पर्यंत मुदतवाढ** जाहिर केली आहे. ( सोबत **महाडीबीटी पोर्टल** वरील अर्जांची विभागवार सद्य:स्थिती दर्शविणारा तक्ता जोडला आहे.) तरी संस्थेमध्ये शिकणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांकडून संबंधित योजनेचे नवीन व नूतनीकरणाचे अर्ज तात्काळ भरुन घ्यावे व संस्थांनी त्यांच्या लॉगीनमध्ये प्राप्त होणाऱ्या अर्जांची छाननी प्रलंबित न ठेवता निकाली काढावे.

तसेच विभागीय कार्यालयांनीसुध्दा, संस्थेने पाठविलेल्या नवीन व नूतनीकरणाच्या अर्जांची छाननी प्रलंबित न ठेवता निकाली काढावी आणि याबाबतची दक्षता सहसंचालक यांनी स्वत: घ्यावी.


तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे.

1 3 OCT 2019

आवक क्र ....1100....


(डॉ. अभय वाघ.)

संचालक,

तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई.

प्रत : १) मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ४ था मजला, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर. (लक्षवेध : श्री. संजय धारुरकर, अवर सचिव)

२) मा. प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, ७ वा मजला मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर. ( लक्षवेध : श्री. सं.वा. जाधव, कक्ष अधिकारी )

mahadbtmahait.gov.in

Skip To Navigation

Benefit Schemes

2019
October
31

Last Date for DBT Post Matric Application Submission

डीबीटी पोस्ट मॅट्रिकसाठी अर्ज भरण्याची अंतिम दिनांक ३१ ऑक्टोबर २०१९

Notice

...lication Acceptance A.Y 20... for Merit Schemes is from 1... ...ust 2019 till 31st October ...9

...lication Acceptance other ... Merit Schemes for A.Y 20... ...s from 1st August 2019 till 3... ...ober 2019

Download Colleges list

Click here for Help

Help Videos

- Tribal Development Department
- Directorate of Higher Education
- Directorate of Technical Education
- School Education and Sports Department
- OBC, SEBC, VJNT & SBC Welfare Department
- Directorate of Medical Education and Research

...in MAHADBT Group on ...icrosoft Kaizala

...ew Applicant Registration

...pplicant Login

...stitute / Dept / DDO Login

Grievance / Suggestions

User Manuals

- Help file for Online Application Pro...
- Pop Up Blocker Guidance
- Forgot Password
- Forgot Username
- Aadhaar seeding with NPCI mappi...